**रे.फौ.ख.क्र. २६९/२००८**
निशाणी क्र. ६२

## <u>दोषारोप</u>

मी प्र.चं. बारटक्के, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (कोर्ट क्र.७) कराड, जि. सातारा खालील प्रमाणे तुमच्यावर दोषारोप ठेवत आहे.

तुम्ही,

आरोपी क्र.१) सुनिता सुरेश शिंदे, वय —— वर्षे, धंदाः मजुरी
३) सोनाबाई तानाजी शेळके, वय —— वर्षे, धंदाः शेती
५) पवित्रा मोहन माळवे, वय —— वर्षे, धंदाः नोकरी
६) सिमा संजय चौगुले, वय —— वर्षे, धंदाः चालक
७) अधिक श्रीरंग शिंदे, वय —— वर्षे, धंदाः शेती
सर्व रा.डवरी गल्ली, कार्वेनाका, ता.कराड, जि.सातारा

दि.२४/०४/२००८ रोजी १६.३० वाजनेचे सुमारास मौजे कराड, ता.कराड, जि.सातारा गांवचे हद्दीत कराड शहर पोलीस ठाण्याच्या आवारात तुम्ही समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशिर जमाव जमविला व जाणीवपूर्वक त्या जमावात सामील झाला. अशाप्रकारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम १४३ प्रमाणे माझे अधिकारक्षेत्रात गुन्हा केला आहे.

वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्हाला बेकायदेशिर जमावाला पांगविण्याचा आदेश दिला हे माहीत असूनही त्यात सामील झाला. अशाप्रकारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम १४५ प्रमाणे माझे अधिकारक्षेत्रात गुन्हा केला आहे.

वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशिर जमाव जमविला व दंगा केला. अशाप्रकारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम १४७ प्रमाणे माझे अधिकारक्षेत्रात गुन्हा केला आहे.

वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशिर जमाव जमवून जाणीवपूर्वक दंगा केला. अशाप्रकारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम १४९ प्रमाणे माझे अधिकारक्षेत्रात गुन्हा केला आहे.

वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही शासकीय कार्यामध्ये अडथळा आणला. अशाप्रकारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम १८६ प्रमाणे माझे अधिकारक्षेत्रात गुन्हा केला आहे.

उपरोक्त दोषारोपांच्या संदर्भात तुमचेवर खटला चालेल.

कराड. (प्र.चं.बारटक्के)
दिनांक: २४/०१/२०१७ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कराड,
जि.सातारा.

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, वरील दोषारोपा मधील मजकुर आरोपींना त्यांचे मातृभाषेत वाचून व समाजावून सांगितला.

कराड. (प्र.चं.बारटक्के)
दिनांक: २४/०१/२०१७ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कराड,
जि.सातारा.

<u>आरोपींचे प्रतिकथन</u>

प्र.१. तुला पोलीस पेपरच्या नकला मिळाल्या कां?
उ. होय.
प्र.२ तुला मराठीतून वाचून दाखविलेला आरोप समजला कां?
उ. होय.
प्र.३. तुला गुन्हा कबुल आहे कां?

उ. होय. मला गुन्हा कबुल आहे.

कराड.
दिनांक: २४/०१/२०१७ सही आरोपी क.१:— .........................

समोर, आरोपी क.३:— .........................

आरोपी क.५:— .........................

(प्र.चं.बारटक्के) आरोपी क.६:— .........................

न्यायदंडाधिकारी वर्ग—१,कराड. आरोपी क.७:— .........................

## <u>न्यायनिर्णय</u>

<u>(जाहीर केल्याचा दि. २४/०१/२०१७)</u>

आज रोजी आरोपी क्र.१, ३ व ५ ते ७ यांचेवर निशाणी ६१ प्रमाणे दोषारोप ठेवणेत आला. त्यांनी त्यांचेविरुध्द तोहमत गुन्हा मान्य व कबुल केला आहे. आरोपींचे मान्य घटनेवरुन त्यांचेविरुध्द गुन्हा शाबित होत असल्याने मी या ठिकाणी आरोपींचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकण्यासाठी थांबत आहे.

कराड. (प्र.चं.बारटक्के)
दिनांक: २४/०१/२०१७ न्यायदंडाधिकारी वर्ग–१, कराड.

२. प्रस्तुतचा गुन्हा आरोपींचे हातुन अनावधानाने घडला असुन तो त्यांचा पहिलाच गुन्हा आहे. आरोपी यांचेवर त्यांचे कुटुंब अवलंबुन आहे. त्यामुळे आरोपींना तुरुंगवासाची शिक्षा दिल्यास आरोपींचे कुटुंबावर उपासमारीची वेळ येणार आहे. तसेच आरोपींनी प्रस्तुत गुन्हा पुन्हा करणार नाही अशी ग्वाही दिली आहे. याउलट सरकारी वकीलांनी आरोपींचा गुन्हा शाबित झाल्याने त्यांना जास्तीत जास्त शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

३. अभियोगपक्षाचे केसनुसार व आरोपींचे म्हणण्यानुसार त्यांचेविरुध्द प्रस्तुत कलमाखालील ही पहीलीच केस असल्याचे स्पष्ट होत आहे. आरोपींचे म्हणण्यातुन त्यांची कौटुंबिक पार्श्वभुमी समोर येत आहे. परिणामी आरोपींना द्रव्यदंडावर खुले करणे न्यायोचित होणार आहे. एकंदर परिस्थितीचा विचार करता आरोपींना भारतीय दंड संहिता कलम १४३, १४५, १४७, १८६ सह कलम १४९ या गुन्ह्यांसाठी प्रत्येकी र.रु. २००/– असा प्रत्येकी एकूण र.रु. ८००/– दंड करणे मला न्यायावह वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

०१. आरोपी क्र.१ सुनिता सुरेश शिंदे, क्र.३ सोनाबाई तानाजी शेळके, क्र.५ पवित्रा मोहन माळवे, क्र.६ सिमा संजय चौगुले, क्र.७ अधिक श्रीरंग शिंदे यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये आरोपींना भारतीय दंड संहिता कलम १४३, १४५, १४७, १८६ सह कलम १४९ या गुन्ह्यांसाठी प्रत्येकी र.रु.२००/— **असा प्रत्येकी एकूण र.रु. ८००/— (र.रु.आठशे फक्त)** दंडाची शिक्षा ठोठावणेत येत आहे. दंड न भरल्यास ७ दिवसांची साधी कैद भोगणेची आहे.

०२. तसेच आरोपी क्र.१, ३, ५, ६ व ७ यांना कोर्ट उठेपर्यंत शिक्षा करणेत येत आहे.

कराड.
दिनांक: २४/०१/२०१७

(प्र.चं.बारटक्के)
न्यायदंडाधिकारी वर्ग—१,कराड.